# <u>प्रेसनोट</u>

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. २५/०५/२०१८

## ग्रामपंचायत आंबवणे, ता.मुळशी, जि. पुणे येथील सरपंच व उप-सरपंच यांना २,८०,०००/- रूपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

---

यातील तक्रारदार यांचे मालकाचे देवघरगाव ता. मुळशी येथे सर्व्हे नंबर ३०७/३,३०८/३ प्लॉट नंबर ११७/११८ येथे १ एकर क्षेत्र आहे. मालकाने तेथे २००० स्क्वेअर फुटाचे घर बांधले आहे. नमूद घराच्या घरपट्टीची नोंद करण्यासाठी तसेच घरपट्टीची पावती देण्यासाठी ग्रामपंचायत आंबवणे, ता.मुळशी, जि. पुणे येथील सरपंच व उप-सरपंच यांनी तक्रारदार यांचेकडे ३,००,०००/- रूपये लाचेची मागणी केली होती सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामध्ये तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची दिनांक २२/०५/२०१८ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक मच्छिंद्र कराळे, सरपंच, ग्रामपंचायत आंबवणे, ता.मुळशी, जि. पुणे व लोकसेवक गणेश मानकर, उप-सरपंच, ग्रामपंचायत आंबवणे, ता.मुळशी, जि. पुणे यांनी तक्रारदार यांचे मालकाचे देवघरगाव ता. मुळशी येथे सर्व्हे नंबर ३०७/३,३०८/३ प्लॉट नंबर ११७/११८ येथे १ एकर क्षेत्र आहे. मालकाने तेथे २००० स्क्वेअर फुटाचे घर बांधले आहे. नमूद घराच्या घरपट्टीची नोंद करण्यासाठी तसेच घरपट्टीची पावती देण्यासाठी त्यांनी तक्रारदार यांचेकडे ३,००,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन आज रोजी सापळा कारवाई केली असता सापळा कारवाईमध्ये लोकसेवक मच्छिंद्र चंद्रकांत कराळे,वय ४४ वर्षे, सरपंच, ग्रामपंचायत आंबवणे, ता.मुळशी, जि. पुणे व लोकसेवक गणेश गजानन मानकर, उप-सरपंच, ग्रामपंचायत आंबवणे, ता.मुळशी, जि. पुणे यांनी तक्रारदार यांचेकडून तडजोडीअंती २,८०,०००/- रूपये लाच रक्कम प्लॉट नंबर ११७/११८ नेचर सोसायटी देवधर गाव ता. मुळशी, जि.पुणे येथे स्विकारल्यावर त्यांना रंगेहात पकडण्यात आले असुन त्याचेवर पौड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामिण, पुणे येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे-
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**
८. **Mobile App - www.acbmaharashtra.net**

(जगदीश सातव)
सहा.पोलीस आयुक्त/पोलीस उप अधिक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे.